"पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना बक्षीस योजना..."

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- हातमाग २०२३/ प्र. क्र.९३ /टेक्स-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १० नोव्हेंबर, २०२३.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. धोरण २०२३ / प्र.क्र.८१ / टेक्स-५, दि.०२.०६.२०२३

**प्रस्तावना :-**

राज्याच्या वस्त्रोद्योगाच्या वाढीस चालना देण्यासाठी व वस्त्रोद्योगाला आवश्यक त्या उपाययोजनांना हातभार लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०२३ मध्ये पुढील ५ वर्षाच्या कालावधीसाठी एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहिर केलेले आहे. सदर धोरणातील मुद्दा क्र.७.८ मध्ये पारंपारिक वस्त्रोद्योग, अतिरिक्त प्रोत्साहने हातमाग विणकर समुदयांचा योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि सामाजिक व आर्थिक विकासात या क्षेत्राच्या योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी महाराष्ट्रातील पाच पारंपारीक क्षेत्रांमधील सर्वोत्कृष्ट डिझाईनचा राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त सत्कार केला जाईल. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पुरस्कारासाठी अनुक्रमे रू. २०,०००/-, रू.१५,०००/- आणि रू. १०,०००/- बक्षिस दिले जाईल. यामुळे हातमागाच्या कलेच्या वाणांचे संरक्षण होईल आणि याक्षेत्रामध्ये मोठया संधी उपलब्ध होतील असे नमूद आहे.

महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग क्षेत्राला प्राचीन काळापासून प्रदीर्घ इतिहास आहे. ही वस्त्रे कापूस, रेशीम, आणि लोकर यासह विविध प्रकारच्या सामुग्री पासून तयार केली जातात. उपजिवीकेचे संरक्षण सुनिश्चित करून पारंपारीक वस्त्रोद्योग विणकराना इतर रोजगारांकडे स्थलांतरीत होण्यापासून परावृत्त करण्याच्या दृष्टीने अतिरीक्त प्रोत्साहन देणे या धोरणाचे उदिष्ट आहे. महाराष्ट्रातील खालील पाच वस्त्रांना पारंपारीक वाण म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

१) पैठणी साडी

२) हिमरू शॉल

३) करवत काटी

४) घोंगडी

५) खण फॅब्रीक

राज्यातील पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना प्रोत्साहन देण्याकरीता पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना बक्षीस योजना तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

Scanned with OKEN Scanner

**शासन निर्णय :-**

राज्यातील पारंपारीक वस्त्रोद्योग विणकरांचा सन्मान करण्यासाठी आणि सामाजिक व आर्थिक विकासात या क्षेत्राच्या योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी, पारंपारीक वस्त्रोद्योग विणकरांना बक्षीस योजनेस या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेअंतर्गत पाच पारंपारिक १) पैठणी साडी (२) हिमरू शाल (३) करवत काटी साडी (४) घोंगडी (५) खण फॅब्रीक हया वस्त्रोद्योग क्षेत्रामधील सर्वोत्कृष्ट डिझाईन्साचा राष्ट्रीय हातमाग दिनानिमित सत्कार केला जाईल. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाला अनुक्रमे रू.२०,०००/- रू. १५,०००/- आणि रू.१०,०००/- बक्षिस दिले जाईल. सदर बक्षिसाची रक्कम पारंपारीक वस्त्रोद्योग विणकरांच्या बँक खात्यामध्ये DBT प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल.

❖ **योजनेचे निकष खालील प्रमाणे राहतील :-**

अ. पारंपारिक वस्त्राचे विणकाम करणारे सर्व विणकर, खाजगी/ सहकारी संस्था/ महामंडळ/महासंघाचे/स्वयंसेवी संस्था/गट सदर स्पर्धेत भाग घेवू शकतील.

ब. अर्जासोबत विणकाम करतानाचा विणकराचा जिओ टॅगींग फोटो सादर करणे गरजेचे राहील.

क. महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

❖ **पुरस्कार निवड करण्याची कार्यपध्दती :-**

i. स्पर्धेत ठेवण्यांत आलेल्या वाणांचा प्रकार पारंपारीक ५ वस्त्रापैकीच असावा.

ii. निवड समिती प्रत्येक पारंपारीक वाणातून पहिले,दूसरे व तिस-या बक्षिसासाठी वाणाची निवड करेल.

iii. निवड समितीतील प्रत्येक सदस्यास एका वाणास १० पर्यत गुण देण्याचे अधिकार असतील.

iv. एकूण गुणांच्या आकडेवारीच्या आधारे पहिल्या, दूसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या बक्षिसासाठी निवड करण्यात येईल.

v. सारखे गुण आल्यास समिती निर्णयानुसार एक बक्षिस दोन स्पर्धकामध्ये विभागून देण्यात येईल.

vi. गुणाचे वाटप, कापडावरील नक्षिकाम (डिझाइन), त्याची अचूकता (करेक्टनेस), रंगसंगती, व कापडाची आकर्षकता यांच्या आधारे करण्यांत येईल.



Scanned with OKEN Scanner

❖ योजनेचा खर्च :-

| स्पर्धेचे प्रकार स्पर्धेची संख्या | पारंपारिक वाणाकरिता घ्यावयाच्या बक्षिसांची रक्कम (रू.) | | | स्पर्धा आयोजनाचा खर्च | एकुण (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| | पहिले बक्षिस | दूसरे बक्षिस | तिसरे बक्षिस | | |
| राज्यस्तरीय पारंपारिक वस्त्रोद्योग कापड स्पर्धा (आयोजक आयुक्त वस्त्रोद्योग) | २०,०००/- (५ पारंपारिक वाणांकरीता एकुण खर्च रूपये १,००,०००/-) | १५,०००/- (५ पारंपारिक वाणांकरीता एकुण खर्च रूपये ७५,,०००/-) | १०,०००/- (५ पारंपारिक वाणांकरीता एकुण खर्च रूपये ५०,०००/-) | १,००,०००/- (१ ठिकाणी स्पर्धेचे आयोजन एकूण खर्च रूपये १,००,०००/-) | ३,२५,०००/- |
| | | | | एकुण रूपये- | ३,२५,०००/- |

१. विजेत्या पारंपारीक वस्त्रोद्योग विणकराला आयुक्त वस्त्रोद्योग यांचे मार्फत पुरस्काराची रक्कम व प्रशस्ती पत्राचे वाटप करण्यात येईल.

२. स्पर्धेत सहभागी होणा-या स्पर्धकाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रमाणपत्र देण्यात येईल.

३. राज्य स्तरीय पारंपारिक वस्त्रोद्योग कापड स्पर्धा वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या स्तरावर आयोजित करण्यात येईल.

४. या स्पर्धेसाठी स्पर्धकाची निवड करण्याकरिता समितीची रचना पुढील प्रमाणे राहिल :-

अ. आयुक्त (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य,नागपूर - अध्यक्ष

ब. वस्त्रनिर्माण तज्ञ किंवा सहायक आयुक्त (हातमाग) - सदस्य सचिव

क. उपसंचालक, विणकर सेवा केंद्र नागपूर /मुंबई - सदस्य

ड. संचालक, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फैशन टेक्नॉलॉजी (NIFT) मुंबई- सदस्य

इ. अध्यक्ष/ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर - सदस्य

ई. स्कूल ऑफ फॅशन टेक्नालॉजी नागपूर यांचे तज्ञ प्रतिनिधी - सदस्य

उ. जिल्हा माहीती अधिकारी, नागपूर - सदस्य

३. या स्पर्धा आयोजित करण्यासाठी येणाऱ्या खर्चास उपरोक्त मर्यादेत मान्यता देण्याचे अधिकार आयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच स्पर्धेचे आयोजन, नियंत्रण व स्थाननिश्चिती करण्याची जबाबदारी ही आयुक्त वस्त्रोद्योग यांची राहिल.

४. सदर स्पर्धा आयोजित करण्यासाठी येणारा खर्च मागणी क्रमांक व्ही-२, २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११० संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (०३) (०४) एकात्मिक व



Scanned with OKEN Scanner

शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना बक्षिस योजना (कार्यक्रम) (२८५१ ७४२७) ३३,अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखालील उपलब्ध असलेल्या तरतुदीखाली भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१११०१८३४०३०४०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRADDHA DEVEN KOCHAREKAR

(श्रध्दा कोचरेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स. मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (गृह,विधी व न्याय) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
५. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.
७. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. महालेखापाल ( लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०. वित्त विभाग(व्यय-२), मंत्रालय, मुंबई.
११. नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर.
१४. संचालक, नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फैशन टेक्नॉलॉजी (NIFT), मुंबई.
१५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ (महाटेक्स), मुंबई.
१६. अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१८. प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग), सर्व.
१९. निवड नस्ती ( टेक्स-३).



Scanned with OKEN Scanner